# २२ वित्त आयोग

## कलम - 280 (1)

- केंद्र व घटकराज्य सरकार यांच्यामध्ये वित्तीय साधन सामग्री (उत्पन्न) चे विभाजन करण्यासाठी वित्त आयोगाची तरतुद करण्यात आली आहे.
- राष्ट्रपती वित्त आयोग नियुक्त करतात.
- दर पाच वर्षाने वित्त आयोग नेमला जातो.
- हा घटनात्मक आयोग आहे.
- कलम 280 नुसार वित्त आयोग स्थापन केला जातो.
- कायदामंत्री डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी वित्त आयोगाची स्थापना केली आहे.

## शिफारशी -

- केंद्र व राज्य शासनाच्या उत्पन्नाची वाटणी.
- घटकराज्यांना दिली जाणारी साह्य अनुदाने ज्या तत्त्वाद्वारे करतात ते तत्त्व ठरिवते.
- केंद्र व राज्य कोणत्याही वित्तीय संबंधाशी संबंधित शिफारस करते.
- राष्ट्रपतीने निर्देश केलेली अन्य कोणतीही बाब.

## वित्त आयोगाची रचना -

- एक अध्यक्ष तर चार सदस्य असे एकुण 5 व्यक्तीचा समावेश असतो.
- कायदा करण्याचा संसदेला अधिकार असतो. (आयोगाच्या सदस्यांची पात्रता व निवड बाबत)




- 1951 मध्ये पहिला वित्त आयोग स्थापन करण्यात आला त्याचे अध्यक्ष के.सी. नियोगी होते.
- आतापर्यंत 14 वित्त आयोग पुर्ण झाले आहेत. 15 वा वित्त आयोग (2020 ते 2025) अध्यक्ष ए.के. सिंग.

## प्राप्तीकरापासून मिळणाऱ्या उत्पन्नात शेकडा

| आयोग | अध्यक्ष | स्थापना | काळ | अहवाल | शेकडा वाटा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | के.सी. नियोगी | 1951 | 1952-57 | 1952 | 55% |
| 2. | के. संथानम | 1956 | 1957-62 | 1957 | 60% |
| 3. | ए.के. चंद्रा | 1960 | -1962-66 | 1961 | 65% |
| 4. | पी.व्ही. राजमन्नर | 1964 | 1966-69 | 1965 | 75% |
| 5. | महाविर त्यागी | 1968 | 1969-74 | 1969 | 75% |
| 6. | ब्रह्मानंद रेड्डी | 1972 | 1974-79 | 1973 | 80% |
| 7. | जे.एम. शैलेटे | 1977 | 1979-84 | 1978 | 85% |
| 8. | वाय.बी. चव्हाण | 1983 | 1984-89 | 1984 | 85% |
| 9. | एन.के.पी. साळवे | 1987 | 1989-95 | 1989 | 85% |
| 10. | के.सी. पंत | 1992 | 1995-00 | 1994 | 77.5% |
| 11. | ए.एम. खुस्रो | 1998 | 2000-05 | 2000 | |
| 12. | के. रंगराजन | 2002 | 2005-10 | 30 नोव्हेंबर, 2004 | |
| 13. | विजय केळकर | 2007 | 2010-15 | 30 डिसेंबर, 2009 | |
| 14. | वाय.व्ही. रेड्डी | 2013 | 2015-20 | 15 डिसेंबर, 2014 | |
| 15. | एन.के. सिंग | नोव्हें. 2017 | 2020-25 | 30 ऑक्टोबर, 2018 | |

| वित्त आयोग | घ.रा.वाटा |
|---|---|
| 11 वा | 29.5% |
| 12 वा | 30.5% |
| 13 वा | 39.5% |
| 14 वा | 42% |
| 15 वा | 42% |

## 15 वा वित्त आयोग

- 15 व्या वित्त आयोगाने 2011 च्या जनगणनेचा आधार घेवून शिफारशी केल्या आहेत.
- **अध्यक्ष - एन.के. सिंग**
- **पुर्णवेळ सदस्य -**
  1) शक्तीकांत दास यांची RBI गव्हर्नरपदी नियुक्ती झाल्यामुळे - अजय नारायण झा यांची नियुक्ती.
  2) डॉ. अनुप सिंग
- **अर्धवेळ सदस्य -**
  1) डॉ. अशोक लाहिरी,
  2) डॉ. रमेश चांद
- **सचिव - अरविंद मेहता.**
- **स्थापना** - नोव्हेंबर, 2017
- **अहवाल** - 2019
- मुख्य शिफारशी - घटक राज्यांचा वाटा 42% करण्यात आला. सध्या राज्यांचा वाटा **41%** करण्यात आला आहे.
- करातील वाटा ठरवण्यासाठी खालील आधार -
  1) लोकसंख्या - 15%,
  2) क्षेत्रफळ - 15%,
  3) वने आणि पर्यावरण - 10%,
  4) उत्पन्न तफावत - 45%,
  5) लोकसंख्या कामगिरी - 12.5%,
  6) कर प्रयत्न - 2.5%
- 2011 च्या लोकसंख्येचा आधार घेण्यात आला आहे त्यानुसार सर्वाधिक महसुली वाटा **उत्तरप्रदेश** तर सर्वात कमी महसुल वाटा **सिक्कीम**.

## वेतन आयोग व वित्त आयोग

### सातवा वेतन आयोग - 1 जानेवारी 2016

**पार्श्वभूमी :-**

- न्यायमुर्ती ए. के. माथूर यांच्या अध्यक्षेतेखाली 7 वा वेतन आयोग नेमला आहे. (स्थापना - फेब्रुवारी 2014)
- 19 नोव्हेंबर 2015 रोजी केंद्र सरकारला अहवाल सादर.
- सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात 23.55% वाढ करण्याचे सुचवले आहे. ही शिफारस 1 जानेवारी 2016 पासून लागू करण्यात आली आहे.
- भारत सरकार वेळोवेळी सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतन वृध्दीसाठी आणि संरचनेसाठी वेतन आयोग नेमते.
- या आयोगामुळे मुळ वेतनात 16% भत्यांमध्ये 63% पेन्शनमध्ये 24% वाढ करण्याची शिफारस करण्यात आली आहे.
- या वेतन आयोगाचा 47 लाख कर्मचारी तसेच 52 लाख निवृत्तीधारकांना लाभ होणार आहे.
- आयोगाच्या शिफारसी प्रमाणे देशाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये (GDP) मध्ये 0.65% भार.

**प्रमुख शिफारसी :-**

- या आयोगामुळे कमीतकमी वेतन 18000 रु. व जास्तीत जास्त 2.25 लाख दरमहा वेतनाची शिफारस
- केंद्रीय कॅबिनेट सचिवांचे वेतन प्रति माह 2,50,000 रु. असेल.
- आयोगाने पे बँड (Pay Band) आणि ग्रेड पे प्रणाली बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.
- शॉर्ट सर्व्हिस कमिशन (SSC) च्या अधिकाऱ्यांना 7 ते 10 वर्षानंतर सेवा निवृत्ती होण्याची परवांगी देण्यात आली.
- 3% वार्षिक वेतनाची प्रमुख शिफारस.

सदस्य :- 1) श्री. विवेक राय - अर्थतज्ञ
2) श्री. सचिन रॉय - अर्थतज्ञ
3) श्रीमती मीना अग्रवाल - सचिव

## आतापर्यंतचे वेतन आयोग

| | आयोग स्थापन | अध्यक्ष/प्रमुख | लागू | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|---|
| 1) | जानेवारी 1946 | श्री. श्रीनिवास वददाचेरियार | मे 1946 | किमान वेतन 552 स्थिर |
| 2) | ऑगस्ट 1957 | श्री. जगन्नाथ दास | जुलै 1959 | 39.6 कोटी पगारवाढ |
| 3) | एप्रिल 1970 | श्री. रघुवीर दयाल | जानेवारी 1973 | समादेशकता, पुर्णता |
| 4) | जुन 1983 | श्री. पी. एन. सिंघल | जानेवारी 1983 | 12.82 अब्ज रु. भार |
| 5) | 9 एप्रिल 1994 | श्री. एस. रत्नावेल पांडियन | जानेवारी 1996 | 464.64 अब्ज भार |
| 6) | ऑक्टोबर 2006 | श्री. बी. एन. श्रीकृष्ण | जानेवारी 2007 | एक पदएक निवृत्ती वेतन नियम |
| 7) | सप्टेंबर 2013 | श्री. अशोक कुमार माथुर | जानेवारी 2016 | वन रॅन्क 23.55% वेतन वाढ |

## कृषी अर्थशास्त्राचे वैशिष्टये :

१. शेती उत्पादनासाठी जमिनीची निवड.
२. शेतीसाठी आवश्यक तंत्रज्ञान व अवजारे व्यवस्थापन.
३. योग्य बी-बियाणांचा वापर.
४. सिंचन सुविधांचा विकास
५. शेती उत्पादकतेत वाढ
६. एकांगी पीकांचे उत्पादन किंमत बदलाप्रमाणे उत्पादनात बदल करणे शक्य होत नाही.
७. राष्ट्रांच्या उत्पादनात शेती क्षेत्राच्या उत्पादनात घट होते.
८. भारतीय शेती बहुतांश उत्पादनावर अवलंबून असते.
९. वाहतुकीची सुविधा/व्यवस्था शेतमालाला हमीभाव, दुष्काळग्रस्त परिस्थितीमध्ये उपाययोजना इत्यादींचा अभ्यास कृषी अर्थव्यवस्थेवर होतो.
१०. शेतमालाचे उत्पादन साठवणूक व मालाची विक्री व्यवस्था म्हणजे विपणन यांचा अभ्यास कृषी अर्थशास्त्रामध्ये होतो.

## कृषी अर्थशास्त्राचे महत्व :

* भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीला महत्वाचे स्थान आहे.
* देशाच्या उत्पादनात शेती क्षेत्राचा वाटा कमी झाला असला तरी सुध्दा शेतीला भारताच्या अर्थव्यवस्थेत महत्वाचे स्थान आहे.
* सर्वाधिक रोजगार क्षेत्र म्हणून प्राथमिक क्षेत्राचा उल्लेख केला जातो.
* भारताच्या अन्नधान्य उत्पादनात स्वातंत्र्योत्तर कालखंडात सातत्याने वाढ झाली आहे.
* भारताचा परकीय व्यापार तुटीमध्ये आहे असे असताना सुध्दा परकीय व्यापारात भारतीय प्राथमिक क्षेत्र अधिक्यामध्ये आहे. (कृषी → निर्यात जास्त, आयात कमी)
* भारताच्या उद्योगाचा विकासामध्ये शेतीचा महत्वाचा वाटा आहे. बरेच उद्योग कच्चा मालासाठी शेतीवर अवलंबून आहेत. नियोजन काळात शेतीचा विकास करण्यासाठीचे प्रयत्न झाले.
* भारताच्या पंचवार्षिक योजनेचे सामान्य उद्दिष्टये म्हणजे कृषी विकास होय.

## राष्ट्रीय उत्पादनात शेतीचा वाटा

* भारताचे राष्ट्रीय उत्पादन GDP किंवा GNP मध्ये व्यक्त केले जाते.
* GDP अंतर्गत प्राथमिक क्षेत्राचा वाटा सातत्याने कमी होत आहे. १९५० मध्ये एकूण GDP अंतर्गत प्राथमिक क्षेत्राचा वाटा ५५.४% इतका होता.
* १९५० पासून आजतागायत भारताच्या कृषी उत्पादनात सातत्याने घट झाली आहे.

| वर्ष | वाटा % |
|---|---|
| १९५०-५१ | ५५.४% |
| १९७०-७१ | ४५.९% |
| १९९०-९१ | ३४.०% |

| वर्ष | वाटा % |
|---|---|
| २००७-०८ | १७.८% |
| २०११-१२ | १३.९% |
| २०१५-१६ | १७.२% |

| वर्ष | वाटा % |
|---|---|
| २०१८-१९ | १८ % |

## भारताचे अन्नधान्य उत्पादन :

- आर्थिक नियोजनाच्या काळात १९५० पासून भारतात अन्नधान्याच्या उत्पादनात सातत्याने वाढ झाली आहे.
- २०२१-२२ आर्थिक पाहणी अहवालानुसार अन्नधान्य उत्पादनात वाढ २८५ दशलक्ष टन एवढे वाढले आहे. १९५० मध्ये अन्नधान्य उत्पादनाचे प्रमाण ५३ लाख मेट्रिक टन म्हणजे १९५० ते आजपर्यंत भारताच्या अन्नधान्य उत्पादनात वाढ झाली आहे.
- अन्नधान्य उत्पादनात तांदूळ, गहू, मोठे धान्य, डाळी व इतर घटकांचा समावेश होतो.
- एकूण अन्नधान्य उत्पादनापैकी तांदूळ या पिकाचा सर्वाधिक वाटा आहे. दुसरा क्रमांक गहू आहे.
- उत्पादनातील पिकांच्या वाढीनुसार गळाचे उत्पादन सर्वाधिक आहे.

## रोजगार आणि भारतीय कृषी

- भारतीय अर्थव्यवस्थेत प्राथमिक क्षेत्र सर्वाधिक रोजगार देणारे क्षेत्र आहे. १९५०-१९५७ मध्ये अंदाजीत ७०% लोकसंख्या प्राथमिक क्षेत्रामध्ये कार्यरत होती.
- २००१ च्या जनगणनेनुसार ३८.२% इतका रोजगार देणारे क्षेत्र आहे.
- २०११ च्या जनगणनेनुसार ५४.६% रोजगार देणारे क्षेत्र होते.
- प्राथमिक क्षेत्रातील रोजगार कमी झाला असला तरी अजूनही सर्वाधिक रोजगार देणारे क्षेत्र कृषी क्षे आहे.
- प्राथमिक क्षेत्रामध्ये २०१३-१४ च्या जनगणनेनुसार ४८.९% इतका रोजगार आहे.

## उद्योग आणि भारतीय कृषी

- उद्योग आणि भारतीय कृषी क्षेत्राच्या परस्पराचा संबंध आहे. भारताचे बरेच उद्योग कच्चा मालासाठी शेतीवर अवलंबून Amhï. Ë[|rg Forword Linkage म्हणतात.
  उदा : बी-बियाणे, रासायनिक खते, किटक नाशके, शेतीविषयक अवजारे.

## नियोजन काळात कृषी क्षेत्राचा विकास

भारतीय पंचवार्षिक योजनेचे महत्वाचे उद्दिष्टय म्हणजे कृषी विकास होय. भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेचे मुख्य उद्दिष्टय कृषी विकास होय. पहिल्या योजनेमध्ये सार्वजनिक खर्चापैकी ३१% खर्च कृषी क्षेत्रावर करण्यात आला.

नियोजनाच्या बारा पंचवार्षिक योजनेच्या काळात कृषी उत्पादकता, कृषी अन्नधान्य, सिंचन, वीज पुरवठा, ग्रामीण रोजगार इत्यादी घटकावर आधारित वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले.

## परकीय व्यापारात कृषीचे स्थान

भारताच्या परकीय व्यापारात भारतीय कृषी अधिक्यामध्ये असणारे एकमेव क्षेत्र आहे. भारतीय कृषी क्षेत्राची निर्यात जास्त आहे व आयात कमी आहे. भारताच्या परकीय व्यापारात कृषी क्षेत्राचे योगदान २०१७-१८ च्या आकडेवारीनुसार २.२७% इतका आहे. १९९०-९१ मध्ये आयात २ ते ८% निर्यात १० ते २०% आहे.

| वर्ष | आयात | निर्यात |
|---|---|---|
| १९९१-९२ | २.७९% | १८.४९% |
| २०१२-१३ | ४.९% | १४.१०% |
| २०१३-१४ | ३.२% | १३.८% |
| २०१४-१५ | ५.८२% | १२.१% |

- वरील आकडेवारीनुसार परकीय व्यापारावरील निर्यातीमधील वाटा आयातीपेक्षा अधिक आहे. म्हणून कृषी क्षेत्र, परकीय व्यापारात अधिक्य आहे.

---

## शेती व्यवसाय आणि बाजारपेठ

शेती व्यवसाय आणि बाजारपेठ अर्थव्यवस्थेचा विकास बाजारपेठाच्या विकासावर अवलंबून असतो. बाजारपेठाच्या विकासाला शेती व्यवसाय कारणीभूत आहे. भारतातील उद्योगांना देशांतर्गत मोठी बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचे कार्य शेती व्यवसाय करते.

---

## शेती आणि वाहतुक दळणवळण

यात पूरक संबंध आहे. आर्थिक विकासात पायाभूत सुविधा व दळणवळण यांची महत्वाची भूमिका असते. कृषी क्षेत्रासाठी लागणारा कच्चा माल आणण्यासाठी वाहतुक व पायाभूत सुविधांची गरज असते. कृषी विकासासाठी वाहतुक व दळणवळण सुविधांचा विचार केला जातो.

---

## शेती व्यवसाय आणि सरकारचा महसूल

शेती व्यवसायावर कर आकारण्याचाच अधिकार राज्य सूचीने विषय क्रमांक ४५ नुसार शेती महसूल अहवाल कर आकारण्याचा अधिकार राज्यांचा आहे. शेतीच्या काही उत्पादनावर विशिष्ट कर आकारले जातात.
उदा. जमीन महसूल, तंबाखू वरील उत्पादक शुल्क, शेतमालाची खरेदी–विक्री इ.मधून शासनाला महसूलाची प्राप्ती होते.

---

## भारतातील लागवडीखालील क्षेत्र/जमीन

भारताच्या एकूण जमिनीच्या क्षेत्रफळापैकी ४६% क्षेत्र पिका लागवडीखाली असणारे क्षेत्र आहे. इतर विकसनशील देशापेक्षा भारताचे पिक लागवड क्षेत्र जास्त असल्यामुळे एकूण कृषी उत्पादनामध्ये वाढ होते व कृषी क्षेत्राचा पर्यायाने अर्थव्यवस्थेचा विकास होतो.

---

## भारतीय कृषी आणि इतर क्षेत्र

शेती क्षेत्राच्या विकासासोबत उद्योग, सेवा, संशोधन, तंत्रज्ञान इ. क्षेत्राच्या विकासामध्ये वाढ होते व आर्थिक विकास होतो.

---

## आर्थिक विकास – शेतीची भूमिका

- भांडवलाचा पुरवठा
- अन्नधान्याचा पुरवठा
- कच्चा मालाचा पुरवठा
- बाजारपेठांचा विस्तार
- किंमत स्थैर्य
- ग्रामीण जनतेच्या राहणीमानात सुधारणा
- शेतमजूर पुरवठा
- शेती आधारीत उद्योगांचा विकास